## निशाणी क्र. ७९ वरील आदेश

वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १३ नियम १० नुसार याकामी तहसीलदार यांच्या समोरील बी.एन.डी. केस ०६/२००५ चे प्रकरण व कागदपत्र याकामी मागविण्यासाठी दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी या दाव्याद्वारे बी.एन.डी. केस क्रमांक ०६/२००५ मधील तहसीलदार कोरेगाव यांचा निर्णय रद्द ठरवून मागितला आहे. सदर प्रकरणातील सर्व कागद तहसीलदार कोरेगाव यांच्याकडेच उपलब्ध आहेत. त्या प्रकरणातील जाबजबाब, नकाशा, निकालपत्र व इतर संपूर्ण कागदपत्रे वादीच्या उलटतपासाआधी या कामी मागविणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. या दाव्याच्या सुनावणी करीता व न्यायनिर्णय देण्याकरीता सदर कागदपत्रे आवश्यक आहेत. सदर प्रकरणातील न्यायनिर्णय हा बेकायदेशीर आहे किंवा कसे हे ठरविण्यासाठी सदरचे प्रकरण, कागदपत्रे या कामी मागविणे जरुरीचे आहे. सबब सदर प्रकरण व त्यातील सर्व कागदपत्रे या कामी मागविण्याचा आदेश होण्याबाबत वादींनी विनंती केली आहे.

२. प्रतिवादींनी सदर अर्जास निशाणी क्र. ८० ला म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार बी.एन.डी. केस ०६/२००५ चा निकाल बरोबर आहे का चुकीचा आहे हे ठरविण्याचा अधिकार महसूल अधिका–यांचा आहे. या कामी वादीने अतिक्रमीत क्षेत्र हे त्याच्या मालकीचे आहे का हे शाबीत करावयाचे आहे. सदर कामातील तहसीलदार यांचेकडील कागदपत्रे ही सरकारी कागदपत्रे आहेत, त्याच्या नकला मिळू शकतात, यापूर्वी सदर नकला दाखल करण्यात आल्या आहेत. सबब प्रकरण कब्जेसाठी प्रलंबित आहेत. हे प्रकरण या न्यायालयात आल्यास त्या कामी निष्कारण अडथळे होतील. त्या प्रकरणातील सही शिक्याच्या प्रती मिळू शकतात. केवळ सदरचे प्रकरण लांबविण्यासाठी हा अर्ज देण्यात आला आहे. सबब अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

३. वादी, प्रतिवादी तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. बी.एन.डी. केस क्र. ०६/२००५ मधील जी कागदपत्रे वादी मागवू इच्छितात, ती सर्व कागदपत्रे, सही शिक्याच्या प्रती वादींनी सदर कार्यालयाकडे अर्ज देवून मागणी केली होती व अशा प्रती मिळाल्या नाहीत याबाबत वादीने अर्जामध्ये कथन केले नाही किंवा तसा प्रथमदर्शनी पुरावा देखील सादर केला नाही. वादीने निशाणी क्र. ३ सोबत बी.एन.डी. केस क्र. ०६/२००५ मधील तहसीलदार यांच्या निकालाची प्रत, निशाणी क्र. ४३ सोबत त्या प्रकरणातील प्रतिवादीच्या सरतपासाची प्रतिज्ञापत्राची प्रत, प्रतिवादीच्या उलटतपासाच्या सही शिक्याची प्रत इत्यादी कागदपत्रे सादर केली आहेत. तसेच प्रतिवादींनी निशाणी क्र. ३८ सोबत बी.एन.डी. केस क्र. ०६/२००५ मधील विठ्ठल नामदेव जगताप यांचा उलटतपास, नारायण पांडुरंग जगताप यांचा जबाब, त्या प्रकरणातील नोटीस, निशाणी क्र. ४७ सोबत सदर बी.एन.डी. केसमधील दत्तात्रय नारायण जगताप यांचा उलटतपास, त्या प्रकरणामध्ये चंद्रकांत चव्हाण यांनी दिलेल्या अर्जाची प्रत, सदर निकालाविरुद्धच्या अपीलातील आदेशाची प्रत इत्यादी कागदपत्रे सादर केली आहेत. ज्याअर्थी वादी व प्रतिवादी यांनी सदर प्रकरणातील सही शिक्याच्या प्रती हजर केल्या आहेत, त्याअर्थी त्या प्रती वादीस मिळू शकतात हे प्रथमदर्शनी दिसून येते. प्रस्तूतचे प्रकरण १० वर्षे इतके जुने आहे. तसेच सदर बी.एन.डी. केसमध्ये उपविभागीय अधिकारी यांच्यासह वादी यांनी अपील केले आहे असे दिसून येते. परिणामी वादी मागत असलेली सदर कागदपत्रे तहसीलदार यांच्या कार्यालयात उपलब्ध असतील असे मुळीच वाटत नाही. अशाप्रकारे प्रस्तूत प्रकरणी विनाकरण विलंब होणार आहे असे मला वाटते.

५. वादीने ज्यावेळेस दावा दाखल केला त्यावेळेस त्याला आवश्यक वाटणारी सर्व कागदपत्रे या कामी मागवून घेणे आवश्यक होते. मात्र वादीने त्याचवेळी तसे केले नाही. संदर्भीय बी.एन.डी. प्रकरणाचा निकाल झाल्यानंतर

१० वर्षांनी या प्रकरणात त्या प्रकरणातील कागदपत्रे मागवणे हे विलंबाचे कारण वाटते.

६. सबब वरील सर्व कारणास्तव प्रस्तूतचा अर्ज मंजूर होणेस पात्र नाही असे मला वाटते. परिणामी मी खालील आदेश पारीत करत आहे :

— **आदेश** —

१. अर्ज फेटाळण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : कोरेगाव
दिनांक : २४/०६/२०१९

( गि. सु. माने )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.